# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या जीवाला रुपाली चाकणकरांकडून धोका?

## बीडमधील इसमाची अशोक खरात प्रकरणातील एसआयटीकडे तक्रार,राजकीय वर्तुळात खळबळ

बीड (सरकार): देशात, राज्यात एखादा प्रकार, घटना घडला आणि त्यामध्ये बीड जिल्ह्याचे नाव आलं नाही असं दिसून येत नाही. राज्यात भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तसच घडलं. अखेर बीड जिल्ह्यात कोठेतरी कनेक्शन जोडलं आणि तक्रारी सुरू झाल्या. मात्र आता एक वेगळीच तक्रार समोर आली आहे. चक्क उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या जिवाला रूपाली चाकणकरांकडून धोका असल्याची एक तक्रार एसआयटीकडे करण्यात आली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात सर्वात मोठी खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळातही भूकंप झाल्याचे दिसून येत आहे.

राज्यात गाजत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात आता एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशोक खरातच्या विरोधात स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाकडे बीडमधील एका




व्यक्तीने गंभीर तक्रार दाखल केली




आहे. या तक्रारीनुसार, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या



जीवाला राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यापासून धोका असल्याचे म्हटले आहे. या तक्रारीमुळे राजकीय वर्तुळात आणि पोलीस प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यातील एका इसमाने थेट एसआयटीकडे धाव घेत ही तक्रार नोंदवली आहे. अशोक खरात प्रकरणाशी संबंधित धागेदोरे तपासले जात असताना, या तक्रारीने तपासाची दिशा अधिक गुंतागुंतीची केली आहे. रुपाली चाकणकर यांच्याकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा या तक्रारदाराने केला आहे. तक्रारीत तथ्य किती आणि खोडसाळपणा किती,याचा शोध एसआयटी घेणार आहे. राजकीय आकसातून ही तक्रार करण्यात आली आहे का? या अंगानेही पोलीस तपास होण्याची शक्यता आहे.





beedsarkar
संपादक–आदोडे साहस
E-mail : beedsarkar @ Gmail.com
E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १४३ ■ शनिवार ११ एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१२ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 143 ■ Saturday 11 April 2026 ■RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# अखेर ‘त्या’ कोवळ्या जीवाची मालवली प्राणज्योत




बीड (सरकार): जिल्ह्याच्या केज तालुक्यातील पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावात अल्पवयीन मुलीवर बळजबरी करत तिच्याच चुलत चुलत्याने अत्याचार केल्याची घटना दोन दिवसापूर्वी घडली होती. या घटनेने काका–पुतणीच्या नात्याला काळिमा फासला आहे. दोन दिवसांपूर्वी चुलत्याने केलेल्या अमानुष अत्याचारामुळे गंभीर जखमी झालेल्या चिमुरडीचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा हादरला आहे.

अल्पवयीन पीडीतेने अत्याचारानंतर विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रयत्नात पीडितेची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले होते. तिला तातडीने उपचार करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले होते. तिची सातत्याने खालावत होती. तिची मृत्यूशी झुंज सुरू होती. अखेर तिची मृत्यूशी झुंज संपली... तिची उपचारादरम्यान प्राणज्योत मालवल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेने केजसह संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची लाट पसरली असून गावात शोककळा पसरली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बीड येथील पिंक पथक करत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता घराच्या पाठीमागील गायीच्या गोठ्यातून घरी जात असताना तिला चुलत्याने अडवलं होतं. तिच्यावर जबरदस्तीनं लैगिंक अत्याचार केला होती. कोणाला काही सांगितलं तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी चुलता आणि चुलतीनं दिली होती.चुतला–चुलतीनं केल्याल्या शाररिक आणि मानसिक त्रास पीडितेला मोठा धक्का देणारा होता. हा धक्का कोवळ्या जीवाला सहन झाला नाही. तिने विषारी द्रव्य प्राशन करत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही बाब पीडितेच्या आई–वडिलांना समजली. तिला तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील घाटी हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. दोन दिवसांपासून पीडितेची मृत्यूशी झुंज सुरू होती. शुक्रवारी (१० एप्रिल) अखेर पीडितेची प्राणज्योत मालवली. पीडितेच्या कुटुंबावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला आहे.पीडितेच्या आई वडिलांनी तात्काळ पोलिस ठाण्यात धाव घेतली पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता याप्रकरणी पिडीतेच्या फिर्यादीवरून नराधम चुलत चुलता आणि त्याची पत्नी या दोघांच्या विरोधात केज येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणांमध्ये एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून दुसऱ्या आरोपीच्या शोधासाठी पोलिसांनी पथक रवाना करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे.



बीड : शहरातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना भाजपाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, समता परिषदेचे नेते ॲड.सुभाष राऊत तर दुसऱ्या छायाचित्रात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह राजू जोगदंड, अर्जुन दळे,, अक्षय कोकाटे, संभाजी गायकवाड आदी. (छाया: कृष्णा शिंदे)

## ना.छगन भुजबळ थोडक्यात बचावले




नाशिक (सरकार): अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या संदर्भात एक मोठी माहिती समोर येत आहे. एका कार्यक्रमाला जात असताना छगन भुजबळ यांचे हेलिकॉप्टर भलत्याच ठिकाणी उतरल्याचे समजते. हेलिकॉप्टर लँड करताना पायलटकडून मोठी चूक झाल्याची माहिती आहे. यावेळी जरा इकडे तिकडे झाले असते, तर मोठा अनर्थ ओढवला असता, असे म्हटले जात आहे. या प्रकारातून छगन भुजबळ थोडक्यात बचावल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री हे महात्मा फुले जयंतीनिमित्त पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या खानवाडी या गावात आयोजित कार्यक्रमासाठी जात होते. हेलिकॉप्टरने छगन भुजबळ या कार्यक्रमाच्या ठिकाणी जात असताना लँडिंगदरम्यान मोठी चूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नियोजित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्याऐवजी पायलटने ते थेट कार पार्किंगच्या जागेत उतरवल्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

## पिस्टल धारक धाबा चालक जेरबंद

### बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड (सरकार): बीड जिल्ह्यात सध्या विनापरवाना गावठी पिस्टल वापरत असल्याचे चित्र दिसत आहे. बीड गावठी बनावटीची पिस्टल बाळगणाऱ्या एका इसमाला स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने छापा टाकून जेरबंद केले आहे. ही कारवाई १० एप्रिल रोजी रात्री उशिरा करण्यात आली.




मिळालेल्या माहितीनुसार, मौजे सोमनवाडी शिवारातील एका धाब्यावर विलास अंकुश चाटे हा गावठी पिस्टल बाळगत असल्याची खात्रीलायक माहिती स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास संबंधित धाब्यावर छापा टाकला.छाप्यात विलास चाटे याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून सुमारे ४० हजार रुपये किंमतीची गावठी बनावटीची पिस्टल जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस नाईक गोविंद भताने यांच्या फिर्यादीवरून बर्दापुर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९७/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध आर्म ॲक्टच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी बर्दापुर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार गोविंद भताने, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, तसेच पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळे आणि विकास राठोड यांचा समावेश होता.

## कार ४ वेळा पलटी ;पतीसह गर्भवती पत्नी जखमी

आष्टी (सरकार): तालुक्यातील बावी फाट्यावर शनिवारी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास कार आणि दुचाकीच्या हुलकावणीमुळे भीषण अपघात झाला. पाटोदा तालुक्यातील मारुतीची पांगरी येथे सासरवाडीच्या यात्रेसाठी कारने (MH 12 FF 3795) निघालेले हाजीपूर येथील संतोष गोल्हार आणि त्यांची पत्नी या अपघातात जखमी झाले आहेत. दुचाकीस्वाराने अचानक हुलकावणी दिल्याने गोल्हार यांचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कारने चार पलट्या घेतल्या.

अपघाताची भीषणता इतकी होती की कार रस्त्याच्या कडेला जाऊन चार वेळा उलटली.



या अपघातात संतोष गोल्हार यांच्या पत्नी, ज्या गरोदर आहेत, त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. अपघातानंतर त्यांना तीव्र वेदना होत असल्याने तातडीने आष्टी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. अपघात होताच परिसरातील नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने जखमींना बावी येथील खाजगी दवाखान्यात प्रथमोपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना आष्टीला हलवण्यात आले आहे. सुदैवाने या भीषण अपघातात जीवितहानी टळली असली तरी कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.




# संपादकीय

## पूर्णविरामाची प्रतिक्षा

जवळपास ४० दिवसापासून अमेरिका, इस्त्राईल आणि इराणमधील संघर्ष चालू होता. या युध्दामुळे युरोपीय देश, आशियाई देश आणि अखाती देश या भागात कमालीचे चिंतेचे वातावरण होते. आपल्या देशात देखील या युध्दाचा मोठा परिणाम झाला. पेट्रोल डिझेल, घरगुती गॅससह खतांची टंचाईही भासू लागली. आता परिस्थिती हळूहळू पुर्वपदावर येत असतांनाच युध्दाला अर्धविराम देण्याची घोषणा दोन्हीही देशाकडून झाली. सुरूवातीला अमेरिका, इराण आणि इस्त्राईल याचे युध्द चालू आहे. आपला काय संबंध? अश्या भावना देशामध्ये सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत होता. मात्र जसा जसा परिणाम होवू लागला, तसे तसे युध्दाची झळ बसू लागली. अगदी बीडसारख्या शहरात देखील गॅस सिलेंडरसाठी एजन्सीसमोर रांगा लागल्या. प्रशासनाने ररॉकेल विक्रेत्यांची बैठक घेतली. शेतकर्‍यांना खत मिळेनासे झाले, बीडच्या मोंढ्यामध्ये खताच्या गोणीमागे ३०० ते ४०० रूपयांची वाढ झाली. त्यामुळे शेतकरीही हतबल झाले. आता युध्द थांबले आहे ते पुन्हा सुरू होवू नये अशीच सर्वसामान्यांची भावना आहे. अर्धविराम भेटला आता पूर्णविरामाची प्रतिक्षा बीडपासून तर अख्या देशात लागून राहिलेली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणला निर्वाणीचा इशारा दिला होता. मंगळवारपर्यंत त्यांनी माघार घेतली नाही तर इराण बेचिराख करण्याची धमकी दिली होती. प्रत्यक्षात तशी वेळ आली नाही. कारण मंगळवारी रात्री उशिरापर्यंत पडद्यामागे बर्याच घडामोडी घडल्या आणि इराणने दिलेल्या अटी मान्य करत युद्ध दोन आठवड्यांसाठी थांबवण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांना इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही साथ दिल्यामुळे आखाती देशात पुन्हा शांतता नांदेल अशी अपेक्षा बाळगूया! मुळात हे युद्ध का झाले हेही समजून घ्यायला हवे. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला रोखण्यासाठी आणि इराणच्या लष्करी पायाभूत सुविधा नष्ट करण्यासाठी अमेरिकेने इस्त्रायलच्या सहकार्याने हे युद्ध केले. इराणला दोन-तीन दिवसांत गुडघ्यावर आणू, असा त्यावेळी ट्रम्प यांचा दावा होता. पण झाले उलटेच आणि इराणनेच अमेरिकेचे प्रचंड नुकसान केले. अमेरिकेची लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर पाडले, बाजूच्या देशांमधील अमेरिकेचे लष्करी तळ उद्ध्वस्त केले. मुळात युद्धाची गरज नसताना केवळ अहंकारापोटी ट्रम्प यांनी हे युद्ध सुरू केले होते. त्यावेळी युद्ध अमेरिकेने सुरू केले असले तरी शेवट इराण करेल, असे इराणने सुनावले होते. इराणच्या सेनापतींची ही वाणी जवळपास खरी ठरली आहे. कारण ट्रम्प यांच्या या युद्धखोरीमुळे अमेरिकेतील जनता त्यांच्याविरोधात गेली आहे. ट्रम्प यांच्याविरोधात लाखोंच्या संख्येने अमेरिकी लोक रस्त्यावर उतरत आहेत. ही बाब बेदखल करता येणार नाही. त्यामुळे हे थांबवण्यासाठी ट्रम्प यांना निमित्त हवे होते. आता त्यांनी इराणच्या १० अटी मान्य केल्याचे म्हटले

आहे. दुसर्या बाजूला हा युद्धविराम म्हणजे इराणचा मोठा विजय असल्याचे त्यांचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी म्हटले आहे. त्याचवेळी खामेनी यांनी पाकिस्तानचे आभार मानले आहेत. इराणकडून पाकिस्तानचे आभार ही बाब भारतासाठी महत्त्वाची आणि चिंताजनक आहे. कारण इराण हा आपला एकेकाळचा मित्र देश होता. भारत इराणकडून डॉलरऐवजी रुपयांमध्ये तेल विकत घेत होता. मात्र, भारताची डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी मैत्री सुरू झाल्यानंतर इराणच्या मैत्रीत बाधा आली. तसेच रशियासोबतही झाले. भारत रशियाकडूनही रुपयाच्या मोबदल्यात तेल खरेदी करत होता. मात्र, ट्रम्प यांनी डोळे वटारल्याने आपण रशियाकडून तेल विकत घेणे बंद केले. यांची मोठी आर्थिक किंमत भारताला मोजावी लागली आहे. त्याहीपेक्षा दोन मित्रदेशांना भारताने गमावले आहे, ही बाब लक्षात घ्यावी लागेल. अमेरिका विरुद्ध इराण युद्धाच्या वेळी इराणने चीन आणि बांगलादेशाची इंधनाची जहाजे थांबवली नव्हती. मात्र, भारताची २४ जहाजे अडकली होती. त्यातील सुरुवातीला दोन, नंतर दोन, अशी जहाजे सोडण्यात आली. म्हणजेच बांगलादेश, चीनला जी वागणूक इराणने युद्धाच्या काळात दिली तशी त्यांनी भारताला दिली नव्हती. याचा अर्थ एकेकाळच्या मित्रदेशाला भारताने गमावल्याचे स्पष्ट झाले आहे. हे युद्ध थांबावे यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी करण्यासाठी तसेच आखाती देश आणि चीनच्या सहकायनि दुव्याचे काम करत होते. त्यांच्या मध्यस्थीला यश आले आहे. विशेष म्हणजे आता दोन आठवड्यांसाठी युद्धविराम असला तरी पुढची बैठक पाकिस्तानमधील इस्लामाबादमध्ये होणार आहे. आता प्रश्न आहे या युद्धाने काय साधले? तर हे युद्ध अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अहंकारामुळे सुरू झाले आणि ते अमेरिकेवर जास्त शेकले. युरोपीय देशांनी युद्धासाठी त्यांचे तळ अमेरिकेला वापरू देणार नाही, असे स्पष्ट सांगितले. शिवाय जे युद्ध दोन-तीन दिवसांत संपवू अशा गमजा ट्रम्प मारत होते ते युद्ध ४० दिवस चालले. एवढेच नाही तर त्यामुळे इराण किती शस्त्रसज्ज आहे, हेही दिसले. यामुळे अमेरिकेची पत ट्रम्प यांनी किती तळागाळात नेली, हे जगाला दिसले. या युद्धात किती नुकसान झाले याचा अधिकृत आकडा अजून प्रसिद्ध झालेला नाही. इराण आणि इस्वखायलमधील किती सैनिक मारले गेले, किती नागरिकांचा मृत्यू झाला, किती इमारती जमीनदोस्त झाल्या, इंधनाचे किती तळ बेचिराख करण्यात आले याचे आकडे हळूहळू बाहेर येतील, तेव्हा सर्वांना वास्तवाची जाणीव होईल. या युद्धातून कुणी काही कमावले नाही आणि काहीही साध्य झाले नाही. असो, आता युद्धाला अल्पविराम मिळाला आहे मात्र, या युद्धाला पूर्णविराम मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे इस्लामाबादमधील बैठकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

# शिक्षण, समता आणि संघर्ष

**देशात सामाजिक समता, शिक्षणातील न्याय आणि लोकशाही मूल्यांबाबत नव्याने चर्चा रंगत असताना आज महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाची सुरुवात होत आहे. ही केवळ ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानाला आरसा दाखवणारी संधी आहे.**

## फुले विचारांची उपयुक्तता

महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये स्थापन केलेल्या 'सत्यशोधक समाज'च्या माध्यमातून जातीय विषमतेविरुद्ध उभा केलेला लढा आजही अपूर्णच वाटतो. संविधानाने समानतेची हमी दिली असली, तरी सामाजिक वास्तवात जातीय भेदभावाच्या घटना अजूनही घडताना दिसतात. सामाजिक न्याय आणि प्रतिनिधित्व यांबाबतच्या चर्चांमध्ये अनेकदा मूलभूत प्रश्न बाजूला राहतात. समाज खर्‍या अर्थाने समताधिष्ठित झाला आहे का? फुले विचार या प्रश्नाकडे पुन्हा पाहण्यास भाग पाडतात.

'गुलामगिरी' या ग्रंथातून फुले यांनी मांडलेली शोषणाची संकल्पना आजच्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेच्या संदर्भातही लागू पडते. एका बाजूला वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, तर दुसर्‍या बाजूला वाढती आर्थिक दरी हा विरोधाभास अधिक ठळक होत आहे. विकासाच्या आकड्यांमागे दडलेल्या सामाजिक वास्तवाकडे पाहण्याची गरज आहे. फुले यांनी मांडलेला 'मानवतेचा धर्म' हा अशा विषमतेविरुद्धचा नैतिक आधार ठरू शकतो.

आजच्या माहितीच्या स्फोटाच्या युगात अंधश्रद्धा आणि दिशाभूल नव्या माध्यमांतून अधिक वेगाने पसरताना दिसते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार, अफवा आणि अवैज्ञानिक विचार सहजपणे प्रसारित होतात. फुले यांनी दिलेला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्कशुद्धतेचा आग्रह या परिस्थितीत अधिकच महत्त्वाचा ठरतो. समाजाने विवेकशीलतेचा स्वीकार न केल्यास प्रगतीची गती मर्यादित राहते, हे वास्तव लक्षात घ्यावे लागेल.

सध्याच्या सार्वजनिक धोरणांच्या संदर्भातही फुले विचारांची उपयुक्तता अधोरेखित होते. नवीन शैक्षणिक धोरणे, सामाजिक न्यायाच्या योजना आणि समावेशक विकासाच्या संकल्पना यशस्वी होण्यासाठी त्यामागील तत्त्वज्ञान समतेवर आधारित असणे आवश्यक आहे. अन्यथा धोरणे कागदावरच मर्यादित राहण्याचा धोका असतो. फुले यांचे विचार धोरणनिर्मितीला सामाजिक भान देतात.

द्विशताब्दी वर्षानिमित्त देशभर विविध कार्यक्रम, परिसंवाद आणि स्मरणसोहळे आयोजित केले जातील. परंतु हा उत्सव केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहिला, तर तो फुले विचारांशी अन्याय ठरेल. त्यांच्या विचारांचे पुनर्वाचन, समकालीन संदर्भात त्यांचे विश्लेषण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यावर भर देणे आवश्यक आहे. अन्यथा हा सोहळा केवळ प्रतीकात्मक ठरेल.

आजचा भारत 'विकास' आणि 'समता' या दोन संकल्पनांच्या संगमावर उभा आहे. एका बाजूला डिजिटल इंडिया, स्टार्टअप संस्कृती आणि आर्थिक प्रगतीचे दावे आहेत; तर दुसर्‍या बाजूला शिक्षणातील दरी, सामाजिक विषमता आणि मूलभूत सुविधांची कमतरता आहे. या विरोधाभासाच्या पार्श्वभूमीवर फुले विचार दिशादर्शक ठरतात. विकासाचा अर्थ सर्वसमावेशक प्रगती असाच असायला हवा, ही त्यांची भूमिका आजही मार्गदर्शक आहे. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, फुले यांनी स्वप्नात पाहिलेली समताधिष्ठित समाजरचना आपण कितपत उभारली आहे?

एकंदरीत, महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य हे केवळ स्मरणाचे नाही, तर आत्मपरीक्षणाचे आहे. त्यांच्या विचारांची केवळ पुनरावृत्ती न करता त्यांची अंमलबजावणी करणे हीच खरी कृतज्ञता ठरेल.

**– सत्यसाई पी एम**



## महात्मा फुले यांचा क्रांतिकारक वारसा

**भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात महात्मा ज्योतिराव फुले यांचे कार्य अत्यंत क्रांतिकारक आणि दूरदर्शी मानले जाते. त्यांनी ज्या काळात काम केले, त्या काळात समाजात जातीय विषमता, स्त्रीदास्य, अज्ञान आणि अंधश्रद्धेचे साम्राज्य होते. अशा परिस्थितीत फुले यांनी शिक्षण, समता आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीची पायाभरणी केली. त्यांचा वारसा आजही समाजाला दिशा देणारा आणि प्रेरणा देणारा आहे. आज त्यांची जयंती.**

महात्मा फुले यांच्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे शिक्षण. त्यांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे सर्वात प्रभावी साधन मानले. १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून त्यांनी भारतीय समाजात एक ऐतिहासिक पाऊल उचलले. त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध होता, तरीही त्यांनी हा संघर्ष स्वीकारला. त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांनी या कार्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या आणि त्यांनी समाजाच्या विरोधाला न घाबरता मुलींना शिक्षण देण्याचे कार्य सुरू ठेवले. महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठीही मोठा संघर्ष केला. त्या काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यांना सामाजिक बंधनांमध्ये अडकवले जात होते. फुले यांनी विधवाआश्रमे सुरू करून, बालविवाहाविरुद्ध आवाज उठवून आणि स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देऊन स्त्रियांच्या सन्मानासाठी लढा दिला. त्यांनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. फुले दांपत्याचा हा प्रयत्न केवळ शिक्षणाचा नव्हता, तर तो स्त्रीमुक्तीचा आणि सामाजिक जागृतीचा आरंभ होता.

फुले यांना ठाम विश्वास होता की शिक्षणाशिवाय समाजातील शोषित घटकांना न्याय मिळू शकत नाही. म्हणूनच त्यांनी केवळ उच्चवर्णीयांसाठी मर्यादित असलेल्या शिक्षणाच्या चौकटीला आव्हान दिले. त्यांनी शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. त्यांनी शिक्षणाला सामाजिक समतेचे साधन बनवले. त्यांच्या या विचारांमुळे स्त्रिया आणि वंचित घटकांमध्ये आत्मभान आणि स्वाभिमानाची भावना निर्माण झाली.

महात्मा फुले सामाजिक समतेसाठीच्या व्यापक लढ्याचे नेतृत्व करत होते. त्यांनी जातिव्यवस्थेच्या अन्यायकारक स्वरूपावर कठोर टीका केली आणि वर्ण आधारित सामाजिक रचनेला आव्हान दिले. 'गुलामगिरी' या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथातून त्यांनी भारतीय समाजातील शोषणाच्या रचनेचा पर्दाफाश केला. त्यांनी दाखवून दिले की धर्म आणि परंपरेच्या नावाखाली समाजात विषमता टिकवून ठेवली जाते. त्यामुळे या विषमतेविरुद्ध लढण्यासाठी विचारपरिवर्तन आवश्यक आहे.

१८७३ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजाला संघटित केले आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. सत्यशोधक समाजाने जातीय भेदभावाला विरोध केला आणि समानतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. विवाह, धार्मिक विधी आणि सामाजिक व्यवहारात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ही चळवळ सामाजिक क्रांतीचा महत्त्वाचा टप्पा ठरली.

फुले यांच्या विचारांमध्ये शेतकरी आणि कामगार वर्गाचाही प्रश्न महत्त्वाचा होता. त्यांनी शेतकर्‍यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. 'शेतकर्‍याचा असूड' या पुस्तकातून त्यांनी जमीनदारी आणि अन्यायकारक करप्रणालीवर टीका केली. त्यांनी आर्थिक विषमतेलाही सामाजिक विषमतेइतकेच महत्त्व दिले. त्यांच्या मते, सामाजिक न्याय साध्य करण्यासाठी आर्थिक न्यायही आवश्यक आहे.

फुले यांचा संघर्ष हा केवळ सैद्धांतिक नव्हता, तर तो प्रत्यक्ष कृतीतून दिसून येतो. त्यांनी समाजातील प्रस्थापित शक्तींना थेट आव्हान दिले आणि त्यासाठी सामाजिक बहिष्कार, अपमान आणि विरोध सहन केला तरीही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांच्या विचारांमध्ये मानवतावाद, समता आणि बंधुता यांचा ठाम आग्रह दिसतो. त्यांनी विवेक, तर्क आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना प्राधान्य दिले.

**– दीपाली कांबळे**

## समस्या...?

सोशल मीडियावर एक बातमी वाचली. त्या बातमीतील घटना खूप अस्वस्थ करून गेली. त्या घटनेचा सारांश देते. साधारण चाळिशीचे जोडपे. दिसायला खूप सुंदर. अगदी चार-पाच वर्षे एकमेकांना जाणून घेऊन प्रेमविवाह केलेले!

एके दिवशी एक घटना घडली आणि त्या दुर्दैवी घटनेची नोंद सीसीटीव्हीने घेतलेली होती. रात्री १२ च्या सुमारास हे चाळिशीचे जोडपे बराच वेळ रेल्वे क्रॉसिंग गेटजवळ उभे होते. त्यांना दूरवरून एक एक्स्प्रेस गाडी येताना दिसली आणि ते शांतपणे एकमेकांचा हात घट्ट हातात धरून रेल्वे रुळावर जाऊन उभे राहिले. याच सीसीटीव्हीने त्यांच्या शरीराच्या कुठे आणि कशा ठिकर्‍या उडाल्या याचीही व्यवस्थित नोंद घेतली. त्यानंतर जेव्हा या दोघांनी केलेल्या आत्महत्येचा तपास केला गेला तेव्हा लक्षात आले की, त्यांना मूलबाळ होत नसल्यामुळे त्यांनी आत्महत्या केली. बाकी बातमीत त्या दोघांची नावे, ते कोणत्या गेटजवळ उभे होते, कोणत्या गाडीने त्यांना उडवले वगैरे माहिती आहेच, जी या लेखात देणे मला जरूरी वाटली नाही.

माणसाचा मृत्यू कदाचित मला कमी अस्वस्थ करतो; परंतु 'आत्महत्या' ही गोष्ट मला खरंच खूप जास्त अस्वस्थ करते. 'मूलबाळ न होणे' ही समस्या आहे का? किंवा अगदी ठरवून काही जोडपी 'मूलबाळ



होऊ देत नाहीत' हीसुद्धा समस्या आहे का? जगात अगणित समस्या आहेत. त्या सर्व समस्यांपेक्षा आपली समस्या कमी महत्त्वाची आहे, असे का मानले जात नाही? असा का विचार केला जात नाही?

आजच्या काळात असंख्य अनाथाश्रम आहेत तिथून एखादे मूल दत्तक घेऊन त्यांनी वाढवले असते, तर चालले नसते का? एका जीवाला कुटुंब मिळालं असतं आणि एका कुटुंबाला कदाचित जीवदान...!


जेव्हा कोणता तरी टोकाचा निर्णय घ्यायचा असतो आणि ती गोष्ट आपल्याला ती चुकीची की बरोबर, हे जाणून घेण्यासाठी कदाचित घरात वयस्कर माणसे नसतील, कदाचित नातेवाईक आणि शेजारीपाजारी सुद्धा जवळचे वाटत नसतील तरीसुद्धा अनेक मानसोपचार तज्ज्ञ आहेत, त्यांच्याकडे हे का जात नाहीत?

अत्यंत सुदृढ, उच्चशिक्षित, समाजात नावलौकिक असणारी, आर्थिक सुबत्ता असणारी माणसेसुद्धा मानसिक रुग्ण होतात याचे वाईट वाटते. आपण एखाद्या समस्येला तोंड देऊ शकत नाही, त्याचा आपल्याला त्रास होतोय हे सुरुवातीला तरी आपल्याला कळत असते तेव्हाच स्वतःहून मानसोपचार तज्ज्ञाकडे जाण्याची गरज असते. आजकाल मनाला उपचार होऊ शकेल अशी अतिशय उत्तम औषधोपचार पद्धती असल्याचे अनुभव डॉक्टरांकडून आणि ज्यांनी अशा तर्‍हेचे उपचार घेतले आहेत त्यांच्याकडूनही ऐकले आहेत.

दात दुखायला लागल्यावर आपण दंतवैद्याकडे जातो, ताप आल्यावर आपल्या फॅमिली डॉक्टरकडे जातो, हात तुटल्यावर हाड वैद्यांकडे जातो आणि तो जोडून घेतो तसे सहजपणे मानसिक समस्या निर्माण झाल्यावर आपण मानसोपचार तज्ज्ञाकडे का जात नाही? तिथे जाणे कमीपणाचे वाटते का? किंवा डॉक्टर काही औषध, गोळ्या देईल; परंतु आपली समस्या काही मिटवू शकणार नाही असे त्यांना वाटते का? काही कळत नाही. अशा दुर्दैवी घटना घडून गेल्यानंतर त्याच्या बातम्या मिळतात.

असो. माझ्या ओळखीच्या एका कुटुंबाने एक मुलगी दत्तक घेतली आणि तिला शिकवून त्यांनी डॉक्टर केले. तिला त्यांनी दत्तक घेतले तेव्हा ती दीड वर्षांची होती पण ती जेव्हा पाचवीत गेली तेव्हा त्या दांपत्याने तिला समोर बसवून तू आमची 'दत्तक' मुलगी आहेस हे समजावून सांगितले. इतकेच नव्हे तर तिला त्या अनाथाश्रमात घेऊन गेले जिथून त्यांनी तिला दत्तक घेतले होते. तीन-चार तास त्या अनाथाश्रमात घालवल्यावर तिला स्वतःचे कुटुंब असल्याचे महत्त्व लक्षात आले. तिच्या आई-वडिलांचे प्रेम लक्षात आले. इथपर्यंतची ही घटना सामान्य आहे पण त्या पुढची घटना मात्र आपल्याला विचार करायला लावणारी आहे. मुलगी पंचवीस वर्षांची झाली आणि तिच्या आई-वडिलांना या मुलीच्या लग्नाचे वेध लागले; परंतु मुलीने आई-वडिलांना अशी अट घातली की, जो मुलगा माझ्याशी लग्न करेल तो लग्नानंतर लगेचच अनाथ बालकाचे पालकत्व स्वीकारण्याची जबाबदारी माझ्या सोबतीने आनंदाने उचलेल त्याच्याशीच मी लग्न करणार!

या लेखाच्या शेवटी जाता जाता मला हेही सांगायला आवडेल की, समाजात चांगल्या विचारांची माणसे खूप असतात. तिला योग्य जोडीदार मिळाला आणि आज ती दोन मुलांची आई आहे आणि त्यातील एक मूल हे दत्तक आहे!



## जन्मापूर्वी हेल्थ इन्श्युरन्स असणं का महत्त्वाचं आहे?

मॅटर्निटी कव्हर हे बहुतेक सर्वसमावेशक हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसींमधील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कुटुंब नियोजनाचा विचार करणार्‍या जोडप्यांसाठी हे कव्हरेज एक महत्त्वाचे आर्थिक संरक्षण देते.

ज्यामध्ये प्रामुख्याने प्रसूती संबधित आणि प्रसूती नंतरच्या खर्चाचा समावेश होतो. हे प्रसूती पूर्व आणि नंतरचा ९० दिवसांपर्यंत होणारा रुग्णाचा खर्च कव्हर करते.

जसे की हॉस्पिटलमधील वास्तव्य, औषधे, डॉक्टरांची फी आणि सर्जन, नर्स व रुग्णवाहिकेचे शुल्क यांचा अंतर्भाव असतो. तसेच तुमच्या बाळाच्या पहिल्या वर्षातील लसीकरणाचा खर्च पॉलिसीच्या अटी व शर्तीनुसार यामध्ये समाविष्ट होत असल्याने ही पॉलिसी बाळाच्या उत्तम आरोग्यासाठी एक सुरक्षा कवच ठरते.

**गर्भाची प्रसूतीपूर्व काळजी**

प्रसूतीचा खर्च मॅटर्निटी कव्हरमध्ये येतो खरा मात्र, गरोदरपणाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत लागणार्‍या संपूर्ण हेल्थकेअर कव्हरेजचा विचार केला तर आजही अनेक बाबींचा अंतर्भाव त्यामध्ये नसतो. प्रसूतीपूर्व देखभाल कव्हर ही कमतरता भरुन काढते.

अन्यत्र न मिळणारे कव्हरेज या माध्यमातून उपलब्ध होते. ज्यामुळे बाळाच्या जन्माआधीच्या वैद्यकीय गरजा पूर्ण होतात. सर्वसाधारण मॅटर्निटी कव्हरपेक्षा हे वेगळे आहे. कारण हे प्रगत गर्भातील उपचार आणि हाय-रिस्क प्रेग्नन्सी दरम्यान काळजी, विशेष प्रसूतीपूर्व हस्तक्षेप यांसाठी लागणारा फायनान्शियल सपोर्ट उपलब्ध केला जातो.

म्हणूनच, सुरुवातीपासून शेवटपर्यंत संपूर्ण संरक्षण देणार्‍या सर्वसमावेशक कव्हरच्या शोधात असलेल्या कुटुंबासाठी अशाप्रकारचे ड-ऑन अत्यंत अमूल्य ठरते.

**प्राथमिक निदान चाचण्या :** गर्भातील बाळाच्या आरोग्याची स्थिती वेळीच समजून घेण्यासाठी या कव्हरमध्ये विविध तपासण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**जीवनरक्षक उपचार :** गर्भधारणेत अडथळे आल्यास हे कव्हरेज गर्भातच रक्ताची तीव्र कमतरता असलेल्या बाळांना रक्त देणे, जुळ्या मुलांच्या बाबतीत उद्भवणार्‍या गुंतागुंतीवर लेझर उपचार आणि हृदयाच्या गंभीर समस्यांवरील हार्ट व्हॉल्व्ह शस्त्रक्रिया सारख्या गंभीर उपचारांच्या खर्चाचा भार उचलते.

असे उपचार दुर्मिळ स्वरूपाचे असतात. मात्र, जेव्हा गरज असते तेव्हा ते बाळाचा जीव वाचवण्यासाठी अत्यंत मोलाचे ठरतात.

**प्रगत शस्त्रक्रिया उपचार :** काही वेळा जन्माआधीच बाळाच्या मणक्याच्या किंवा श्वासोच्छ्वासाच्या समस्या लक्षात येतात. अशा वेळी प्रगत शस्त्रक्रिया उपचारामुळे बाळाच्या सुदृढ विकासासाठी वेळेवर उपचार करणे शक्य होते.

जर बाळाच्या जन्माआधीच शस्त्रक्रियेची गरज भासली तर हे कव्हरेज तुम्हाला सर्वोत्तम तज्ज्ञांकडे उपचार घेण्यास मदत करते. जेणेकरून आई आणि बाळ दोघेही सुदृढ राहतील.

**गर्भधारणा सहाय्य प्रक्रिया :** ॲम्निओटिक फ्लुइडच्या (गर्भजल) पातळीचे संतुलन साधण्यासाठीच्या उपचारांसाठी सहाय्य केले जाते.

कुटुंबानी हे विचारात घ्यायला हवे की मॅटर्निटी कव्हर मिळवण्यासाठी किमान २ वर्षे आणि फीटल फ्लरीश सारख्या प्रसूतीपूर्व कव्हरसाठी ९ महिने प्रतीक्षा कालावधी असतो. म्हणूनच, सध्या गर्भधारणेच्या स्थितीत असलेल्यांपेक्षा गर्भधारणेची योजना असणार्‍यांसाठी अधिक उचित ठरते.

प्रसूतीपूर्व देखभाल आणि मॅटर्निटी कव्हर या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मॅटर्निटी कव्हरचा संपूर्ण भर हा डिलिव्हरी आणि तत्काळ प्रसूतीनंतरच्या गरजांवर असतो. तर प्रसूतीपूर्व देखभालीत गर्भधारणेदरम्यान तसेच अगदी जन्माच्या काही महिन्यांपूर्वी आवश्यक वैद्यकीय मदतीवर असतो.

जेव्हा आरोग्याची समस्या उद्भवते, तेव्हाच या पर्यायांची जाणीव होते; अशा वेळी आधीच माहिती नसल्यामुळे योग्य नियोजन करणे कठीण होते.

मॅटर्निटी कव्हरेज आणि प्रसूतीपूर्व सहाय्य यांमधील फरक समजून घेतल्यास भविष्यातील गरजांचे योग्य नियोजन करणे कुटुंबांना सोपे जाते. आजच्या काळात गर्भधारणेदरम्यान अनेक आव्हाने येऊ शकतात. अशा वेळी उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकीय सुविधांची माहिती असल्यास, पालक सुरुवातीलाच योग्य निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे मानसिक व आर्थिक तारण कमी होण्यासा मदत होते.

**– डॉ. तपन सिंघेल,**
एमडी आणि सीईओ, बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड

# फाटक्या आंतरपाटाला सेलिब्रिटींचे ठिगळ म्हणजे लग्नपंचमी...!

अभिनय क्षेत्राला मार्केटिंगची अतीव आवश्यकता नव्वदीच्या दशकात भासू लागली आणि जाहिरातबाजीला धुमारे फुटू लागले. त्यात प्रसार माध्यमापैकी सोशल मिडीया ९० कोटी जनतेच्या हातात पडल्यावर मार्केटिंगचे नवनवे ट्रेंड सुरु झाले. त्याआधी नाटक, चित्रपट केवळ प्रिंट मिडीया पुरतेच मर्यादित होते, त्याची पाळेमुळे ग्लोबलायझेशने पार परदेशात पोचवली. मनोरंजन विश्वातील ही उलथापालथ सर्व भाषांसाठी सारखीच परिणामकारक होती. हिंदी चित्रपटांमधील बदल तर लक्षणीय होते. "कंटेंट" नावाचा एलिमेंट (घटक) महत्त्वाची भूमिका बजावू लागल्यावर छोटेखानी चित्रपटसुद्धा गर्दी खेचू लागले. थोडक्यात आजचा प्रेक्षकवर्ग कंटेंटला किंमत देऊ लागला. मात्र मराठी चित्रपट काही सुधारण्याची चिन्हे आजही दिसत नाहीत. एकावर एक चित्रपट रिलिज होतात आणि त्याच वेगात एकावर एक कोसळण्याचे प्रमाण सुरुच आहे. जागतिकीकरणाच्या धोरणांशी जुळवून न घेतल्यामुळे, पुरेसा सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा अभ्यास न केल्यामुळे गेल्या पंचवीस वर्षांत अनेक निर्मात्यांची बलिदाने पुनःर्निमितीत वाया गेली. केवळ काही निर्माते सोडल्यास (ते देखील एका हाताच्या बोटावर मोजण्यापुरते) मराठी चित्रपट देशोधडीला लागला. यात सर्वांचेच नुकसान झाले. या पडझडीत मराठी अभिनयक्षेत्राला मोठी झळ बसली. कलाकारांना स्वतःला सिद्ध करण्यासाठी चित्रपट हे महत्त्वाचे माध्यम होते परंतू ते बघण्यासाठी प्रेक्षक कुठून आणायचा? हा यक्ष प्रश्न उभा राहिला. साहजिकच यात अर्थकारणाची भूमिका महत्त्वाची असल्याने 'पडेल' हिरो-हिरोईनचा शिक्का माथी बसल्याने त्यांची फेसव्हॅल्यू कोसळली. ही फेसव्हॅल्यू पुन्हा चर्चेत आणायची तर माध्यमांमधून सततचे दिसणे गरजेचे भासू लागले... आणि अभिनय क्षेत्राला मार्केटिंगची अतीव गरज भासू लागली.



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

"मी मराठी नाटक मुळीच करणार नाही..." किंवा मराठी नाट्यक्षेत्राला डाऊन मार्केट समजणाऱ्या कलाकार मंडळीनी कोवीड पश्च्यात मराठी रंगभूमीचा गुपचुप आसरा घ्यायला सुरुवात केली. मग अमुक एक वर्षांनंतर पुन्हा रंगभूमीवर पदार्पण करणाऱ्या नटनट्यांची संख्या वाढत चाललीय. त्यातून निर्माता जगतोय की नाही किंवा नाटकाला व्यावसायिक दर्जा आहे की नाही, या बाबींचा विधीनिषेध न बाळगता स्वार्थी मनोवृत्तीने मराठी सिनेमाच्या मोठ्या पडद्यावर दिसणाऱ्या नटमंडळींची नाटके गावखेड्यात दौऱ्यातून सादर होताना दिसू लागली. कारण प्रत्येक अभिनेत्याला आपली फेस व्हॅल्यू जपायची आहे किंबहुना ती वाढवायचीही आहे. नटमंडळींच्या या ॲप्रोचमधे मराठी नाटक ट्रॅप झाले. मराठी चित्रपटात वारंवार दिसणारी मंडळी नाटकाच्या थेटरात दिसायला लागल्यावर 'अजि म्या ब्रह्म पाहिले' प्रमाणे सर्वसाधारण मराठी प्रेक्षक थेटरात धाव घेतोय आणि कलाकारांसाठी नाटक हे प्रसिद्धी माध्यम आहे, हे अधोरेखित करायला भाग पाडतोय.



हल्लीच लग्नपंचमी नामक नाटक रंगभूमीवर सेलिब्रिटी नटनट्यांना घेऊन बागडतंय... आणि खरंच बागडतंय. म्हणायला यात नाव ठेवायला जागाही नाही पण मराठी नाटकाची व्याख्या वरवरच्या मनोरंजनाची नाही. यात ठोस असे कथासूत्र नाही मात्र भक्कम अशी संहितेची तटबंदीही नाही. चार क्षण टाईमपास झाला की पुरे हो...! असा ॲटीट्यूड मालिका लेखनातून निर्माण झाल्याने परिपक्व विषय नाटकासाठी निवडावा, हा विचार फारच दूर राहतो. कानेटकर, दळवी, सबनीस, तेंडुलकरांची नाटके जगायला आणि जगाकडे बघायला शिकवायची तर आजची नाटके फक्त पहायला सांगतात. "लग्नपंचमी" हे असंच एक नाटक जे फक्त "पाहा" एवढंच सांगतं.

'लग्न पंचमी' हे स्वप्नील जोशी आणि अमृता खानविलकर अभिनित, मधुगंधा कुलकर्णी लिखित आणि निपुण धर्माधिकारी दिग्दर्शित एक नवीन मराठी कॉमेडी नाटक आहे. हे नाटक आधुनिक वैवाहिक जीवनातील गोंधळ, नातेसंबंध आणि समजूतदारपणावर भाष्य करणारे कौटुंबिक नाटक आहे. लग्न हे केवळ दोन व्यक्तींमधील नसून त्यातील अनेक व्यक्तिमत्त्वांमधील असते, हे नाटक हलक्या-फुलक्या विनोदी शैलीतून मांडते. आता खरंच ही विनोदी शैली म्हणावी तर माझ्यासारख्या प्रेक्षकाला गुदगुल्या करुन हसवण्यासाठी तिकिटाबरोबर एक माणूस द्यावा ही लेखिकेला नम्र विनंती. नाटकाचा नायक हा लेखक आहे, तो चॅनल्सच्या रिक्वायरमेंटप्रमाणे एपिसोड पाडतो आणि इतक्या बालिश गोष्टी मान्य करताना प्रेक्षकांनी खळखळून हसायला लावणारी ही कॉमेडी आहे. एक जोडपे जे विभक्त होणार आहे, का ? तर ठोस कारण नायकाला सापडत नाही. असं काही "अरे हसा ना रे..!" असं विनवणारी ही पंचमी आहे. सुरुवातीच्या परिच्छेदांमधे नटनट्यांची, लेखकाची, दिग्दर्शकाची जिवंत राहण्याची धडपड म्हणजे हे नाटक होय. मधुगंधा कुलकर्णींच्या तीन आणि सुनील अभ्यंकरांच्या चार भूमिकांना पुरून उरणारी अमृता खानविलकरने 'सुर्यजा' ही भूमिका मात्र पदार्पणाच्या प्रयोगात अफाट साकारली आहे. म्हणजे नाटकाला लागणारा लाऊडनेस अमृताने सहजगत्या मुरवलाय त्यामानाने स्वप्नील जोशीकडे फारशी व्हरायटी नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झालेय. असो. तर फार काही अपेक्षा ठेऊन आजकालचं नाटक पाहायचं नसतं असं सांगायचं तर नाही ना? असा सवाल उभी करणारी ही लग्नपंचमी आहे.











## कलाकृती एक, कलाकार अनेक...

रंगभूमीवर सादर होणारा प्रत्येक प्रयोग हा ठरलेल्या पद्धतीनेच सादर होतो. संवाद, प्रकाशयोजना, नेपथ्य, संगीत आणि कलाकारांच्या भूमिका प्रत्येक प्रयोगात त्याच पद्धतीने साकार होत असतात. साहजिकच, एखाद्या नाटकाचा प्रयोग अनुभवल्यानंतर 'रिपीट ऑडियन्स' म्हणून पुन्हा त्या नाटकाला गेल्यास पुनर्प्रत्ययाचा आनंद मिळतो. पण समजा, नाटक तेच असेल; मात्र त्यातल्या काही गोष्टी बदललेल्या असतील तर...? अशाच पद्धतीचे एक सूत्र एका नाटकाने अवलंबले आहे; मात्र त्याने नाटकाचा आशय आणि रंजकता याला अजिबात धक्का लागलेला नाही, हे विशेष...!

आता असा अजब प्रयोग साधलेली कलाकृती आहे, ती म्हणजे सध्या रंगभूमीवर धुमाकूळ घालत असलेले 'यदा कदाचित रिटर्न्स' हे नाटक...! आता सर्वच नाटकांप्रमाणे या नाटकाचा प्रयोगही ठरलेल्या पद्धतीनेच होत असला; तरी त्यात एक गोष्ट लक्षणीय आहे आणि ती म्हणजे या नाटकातले कलाकार मात्र काही प्रयोगागणिक बदलत असतात. संतोष पवार लिखित आणि दिग्दर्शित या नाटकात स्वतः संतोष पवार विविध प्रकारची ११ पात्रे रंगवत आहे. मात्र त्याच्या व्यतिरिक्त या नाटकात युवा कलाकारांची जी भली मोठी फळी आहे; ती मात्र वेगवेगळ्या प्रयोगांना बदलत आली आहे. आता या नाटकाचे जवळपास पाचशे प्रयोग होत आले असताना, या नाटकात किती कलाकारांनी भूमिका साकारल्या याची गणतीच करता येत नाही.



राजरंग

राज चिंचणकर

नाटकातले कलाकार बदलत राहिले म्हणून या नाटकाच्या सादरीकरणावर कोणताही चुकीचा परिणाम होत नाही; हे या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अर्थात या सगळ्यावर संतोष पवारचा अंकुश असल्याने हे साध्य होत आले आहे. कलाकार बदलत असले तरी एकूणच नाट्याशयावर किंवा नाटकाच्या रंजकतेवर काहीही परिणाम होत नसल्याने नाटकाचा तोल किंचितही ढळत नाही. ही किमया अर्थात संतोष पवारची असली तरी त्याचे श्रेय संबंधित तमाम युवा कलावंतांनाही द्यावे लागेल. अगदी थोडक्या अवधीत रिहर्सल करून त्या-त्या भूमिकेसाठी उभे राहायचे आणि त्यात काहीही उणीव ठेवायची नाही; हे या कलावंतांना कसे काय जमून येते, ही मोठी आश्चर्याची बाब आहे. हे झाले या नाटकाच्या अंतरंगाच्या बाबतीत; पण



नाट्यसृष्टीच्या दृष्टिकोनातून पाहायचे तर या सगळ्या प्रकारामुळे संतोष पवारने शेकडो युवा कलाकारांना नाटकाचा रंगमंच मिळवून दिला आहे. महत्त्वाचे म्हणजे त्या-त्या कलाकारांनी मिळालेल्या या संधीचा योग्य उपयोगही करून घेतला आहे. नवनवीन कलाकार यातून रंगभूमीवर आले आहेत आणि 'यदा कदाचित रिटर्न्स'ची हीच खास बात आहे.

## माध्यमांतराची गाथा...

कोणत्याही क्षेत्रातल्या कुणा व्यक्तीची जन्मशताब्दी असली की त्या व्यक्तीने त्या क्षेत्रात जे योगदान दिले आहे, त्यासंबंधी आठवणींना उजाळा दिला जातो. असेच एक उदाहरण आता मराठी रंगभूमीवर कायम झाले आहे आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे माध्यमांतर...! प्रख्यात लेखिका महाश्वेतादेवी यांची यंदा जन्मशताब्दी आहे आणि हे औचित्य साधून त्यांच्या तीन कथांवर आधारित 'महोगाथा' हे नाटक मराठी रंगभूमीवर आले आहे. यानिमित्ताने, साहित्य ते नाट्यकृती असा हा माध्यमांतराचा प्रवास झालेला दिसून येत असून, या नाटकाच्या माध्यमातून संबंधित नाटकमंडळींनी महाश्वेतादेवी यांच्या लेखणीला सलाम केला आहे.



या नाटकाचे रंगभूमीवर प्रयोग होत आहेत; इतकेच त्याचे महत्त्व नाही, तर या नाटकाबद्दल वैचारिक चर्चा सध्या नाट्यसृष्टीत सुरू आहे. कारण नेहमीच्या चाकोरीबद्ध पठडीत न बसणारे हे नाटक आहे. मुळात महाश्वेतादेवी यांच्या कथा निवडून त्यावर नाट्यसंहिता लिहायची आणि ती आत्मविश्वासाने रंगभूमीवर सादर करायची; असे महत्त्वाचे कार्य या नाटकमंडळींनी केले आहे. बंगाली भाषेतल्या कथांचे माध्यमांतर, मराठी रंगभूमीवर या नाटकाच्या निमित्ताने झालेले दिसून येत आहे. साहजिकच, या नाटकाच्या माध्यमातून दोन भाषांचे आदानप्रदानही घडून आले आहे. कलेला भाषा नसते याचे उत्तम उदाहरण 'महोगाथा' नाटकाने कायम केले आहे. प्रयोगशीलतेची कास धरलेल्या या नाटकात आघाडीचे कलावंत नसतानाही, आशयानुरूप हे नाटक सध्या मराठी रंगभूमीवर लक्ष वेधून घेत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी, म्हणजेच १४ एप्रिल रोजी संध्याकाळी या नाटकाचा प्रयोग प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या लघु नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. सावित्री मेधातूल यांनी हे नाटक लिहिले असून, मंगेश सातपुते यांनी नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. हृदयनाथ जाधव, विक्रम होता, मुक्ती साधना आणि सावित्री मेधातूल हे कलाकार या नाटकात भूमिका साकारत आहेत. या प्रयोगाच्या माध्यमातून महाश्वेतादेवी यांच्या कार्याला मानवंदना देण्यास ते आता सज्ज झाले आहेत.

## राणादाचा ट्रॅप

'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेत राणाची भूमिका करून लोकप्रियतेचा कळस गाठलेला चॉकलेट बॉय व डॅशिंग अभिनेता म्हणजे हार्दिक जोशी होय. त्याचा 'द ट्रॅप' हा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट नुकताच प्रदर्शित झालेला आहे.

दादरच्या राजा शिवाजी विद्यालयात हार्दिकचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये त्याने भाग घेतला होता. २००४ साली तो दहावीच्या परीक्षेतून उत्तीर्ण झाला. त्यानंतर त्याने खालसा कॉलेजमधून पुढील शिक्षण घेतले. वाणिज्य शाखेतून त्याने ग्रॅज्युएशन पूर्ण केले. गणेशोत्सवामध्ये त्याच्या बिल्डिंगमध्ये संग्राम समेळ, नेहा लेले (गायक आदर्श शिंदेची पत्नी) यांच्यासोबत त्याने स्किटमध्ये भाग घेतला होता. तो तेव्हा अँटॉप हिलला राहायचा, तेंव्हा लहानपणी संग्राम तेथे येत असे. त्याचाकडे तेव्हा नाटकाची पुस्तके होती. त्याच्यातील प्रसंग काढून त्यावर स्किट बसवली जायची. खालसा कॉलेजला त्यावेळी फॅशनचे वारे वाहू लागले होते. हार्दिकचा त्यावेळी व्यायामावर जोर होता. त्याचे मित्र त्याला सांगायचे मराठी मुलांनी फॅशनमध्ये भाग घेणे आवश्यक आहे.त्यामुळे त्याने फॅशन शोमध्ये भाग घेतला. त्या वेळेपासून त्याला या मनोरंजनाच्या क्षेत्राची आवड निर्माण झाली.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

त्याने अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केले. अनेक मालिकांमध्ये त्याने ज्युनिअर आर्टिस्टचे काम केले आहे. कन्यादान, दुर्वा, लक्ष्य, स्वप्नांच्या पलीकडले, राधा बावरी, अघोरी, क्राईम पेट्रोल, जय मल्हार या मालिकांमध्ये त्याने काम केले. त्याने ऑडिशन देणे सुरूच ठेवले होते. अशातच त्याला 'तुझ्यात जीव रंगला' ही मालिका मिळाली. त्यातील त्याची राणाची भूमिका प्रचंड गाजली. ती मालिका त्याच्यासाठी टर्निंग पॉइंट ठरली. आज ही प्रेक्षक त्याला राणदा नावाने ओळखतात, यातच त्या भूमिकेचे महत्त्व आहे. ती लोकांनी दिलेली पदवी आहे व ते नाव राखून ठेवणे त्याचे कर्तव्य असल्याचे हार्दिकने सांगितले. त्यानंतर त्याने तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवे ही मालिका केली. महादेव, कलम ५२ हे चित्रपट त्याने केले. 'द ट्रॅप' हा नवीन चित्रपट नुकताच रिलीज झाला आहे. यामध्ये डॉक्टरच्या भूमिकेत हार्दिक दिसणार आहे. हा ट्रॅप आहे, हे जाळे आहे. यामध्ये हार्दिक नायक आहे की सुजित जाधव असा प्रश्न प्रेक्षकांपुढे उभा राहतो. त्याच नाव खरे आहे की खोटे याबाबत प्रेक्षकांना उत्सुकता राहते. जे चालले आहे ते खरे आहे का असा प्रश्न प्रेक्षकांना पडतो. मर्डर मिस्ट्री असा हा चित्रपट आहे. संजय खापरेची वेगळी भूमिका आहे. आजपर्यंत त्यांनी अनेक पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिका केलेल्या आहेत, परंतु या चित्रपटातील त्यांची पोलीस अधिकाऱ्याची भूमिका वेगळी आहे. हा वेगळ्या धाटणीचा चित्रपट आहे. एका वेगळ्या प्रकारचा हा चित्रपट आहे. सस्पेन्स आहे, थ्रिलर आहे. या चित्रपटामध्ये हार्दिक कॉर्पोरेट लूकमध्ये आहे. प्रत्येक जण दुसऱ्याच्या परिस्थितीचा फायदा घेत असतो. प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे, आपल्या परिस्थितीचा दुसऱ्याला फायदा घेऊ देऊ नका हा महत्वाचा संदेश या चित्रपटातून प्रेक्षकांना द्यायचा आहे. आपण जर सकारात्मक राहिलो तर आपल्या परिस्थितीचा कोणीही फायदा घेऊ शकत नाही. आपली परिस्थिती हलाखीची असली तर आपण त्यामध्ये वाहत जातो, त्यासाठी सतर्क असणे आवश्यक आहे. आपल्या परिस्थितीचा कोणी फायदा घेणार नाही आणि आपल्याला कोणी ट्रॅपमध्ये अडकवू शकत नाही.

महाराष्ट्रातून सर्वात जास्त चित्रपट पाहिल्याचे कलेक्शन जाते. आपण महाराष्ट्रीय माणसेच जास्त चित्रपट पाहतो. मराठी माणसाने मराठी चित्रपट जास्त पाहिले पाहिजे,त्याचा फायदा मराठी चित्रपट सृष्टीला होईल असे मत हार्दिकने मांडले. सध्या मराठीत वेगवेगळ्या विषयावरचे चित्रपट निर्माण होत आहेत ही आनंदाची बाब असल्याचे देखील हार्दिकने नमूद केले. या चित्रपटाचे दिग्दर्शक अमोल खापरे यांच्याविषयी काय सांगशील असे विचारले असता हार्दिक म्हणाला, "अमोलचा हा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट आहे. या अगोदर सहकलाकार म्हणून आम्ही 'अरण्य' या चित्रपटात एकत्र काम केले होते. त्याच वेळी त्यांनी मला सांगितले होते की मी एक चित्रपट निर्माण करणार आहे, त्यामध्ये तुला काम करायचे आहे. त्यावेळी मला खूप आनंद झाला की एक चित्रपट करीत असतानाच दुसऱ्या चित्रपटाची मला ऑफर आली. त्यांना मला या चित्रपटात वेगळ्या भूमिकेत दाखवायचे होते व तसा त्यांनी प्रयत्न देखील केला. मी त्यांच्या कसोटीस उतरलो असेल असे मला वाटते."


अमोल हा नवीन दिग्दर्शक आहे. ज्याप्रमाणे नवीन कलाकाराला सगळे जण सपोर्ट करतात, त्याप्रमाणे नवीन दिग्दर्शकाला कलाकारांनी सपोर्ट केला पाहिजे. या चित्रपटामध्ये मोहन जोशीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. हर हर महादेव चित्रपटात दोघांनी एकत्र काम केले होते. त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळणे हे भाग्य असल्याचे त्याने म्हटले आहे.

'द ट्रॅप' चित्रपटातील ट्रॅप एक असं जाळं की ज्यात एकदा अडकला की सुटणं अशक्य. इथे प्रत्येक पात्र काहीतरी लपवतयं. प्रत्येक चेहरा खरा आहे की मुखवटा हे ओळखणं कठीण जातं. प्रेक्षकांची उत्सुकता नक्की ताणली जाणार हे निश्चित आहे आणि शेवटी रहस्याचं जाळ उलगडेल.



हार्दिक जोशी

## महाशब्दव्यूह 368



**—: आडवे संकेत :—**

1) पिशाच्च झालेला विद्वान ब्राह्मण
4) भाषांतर, स्पष्टीकरण
7) रडण्याचा उमाळा
10) हातचलाखी, इंद्रजाल
12) खेळण्याची वेळ, द्वेष, मत्सर
13) सन्मानाची एक पदवी
14) सुंदर अवयव असलेली स्त्री
15) राखण करणारा, पालक (हिं.)
16) ज्याला कुणी जिंकू शकत नाही असा
17) राष्ट्रभाषेत औषध
21) देखावा दाखविणे
23) मृतास जीवंत करणारी एक वनस्पती
24) मनातल्या कल्पना शब्दांच्या द्वारे प्रगटविण्याचे साधन, बोली
25) विष्णूचा चवथा अवतार
27) प्रसिद्धी, लौकिक
29) एक शुभकारक चिन्ह
31) खेळात अपयशी होणे
32) चित्ताकर्षणासाठी केलेला खोटा हावभाव
33) मृदु
34) एक वृक्ष विशेष
35) मोठे शहर
38) कुटुंब, जात, वंश
39) गुण दोष विवेचन, साधक बाधक टीका
41) काळजी, सांभाळ
42) अग्निची ज्वाला
43) चापट
44) सैन्याचा समुदाय
46) पुढील अर्धा भाग
47) कर्ज देणारा
49) तुझे (सं.)
52) कैफ, धुंदी
54) अक्षरापुढील 'आ' काराची उभी रेघ
55) उणे करणे, कमी करणे
56) कोंबड्याचे आरवणे
57) अधिकार पद,
58) लहान मुलगी
59) पत्नीचा भ्राता
60) दिवाणी कोर्टातला अंमलदार,
61) आकाशयान, अंतराळातून प्रवास करण्याचे साधन
63) नाकाने किंवा तोंडाने आत बाहेर घेतलेला किंवा सोडलेला वायू
64) एखाद्याचे वाईट व्हावे म्हणून केलेला वाक्यप्रयोग
65) ग्रंथाचा भाग, तुकडा
66) हरकत, विरोध, आडकाठी
67) हुंगण्यासाठी असलेली तंबाखुची पुड
68) एखादी गोष्ट सिद्ध करण्याचा नियम
69) जनावरांचा समुदाय, जमाव
71) कृपा, अनुग्रह
72) लग्नास आलेली मंडळी
73) घरात असलेले एक औषधोपयोगी झाड
74) पान, पडणे

**—: उभे संकेत :—**

1) स्त्री संग परित्यागाचे व्रत आजन्म किंवा काही काळापर्यंत करणारा ब्राम्हण
2) वनगाय
3) शिक्षा, दंड (हिं.)
5) पैंजण, चाळ
6) द्वारपाल
7) मुलीच्या लग्नाच्या वेळी वधूच्या पित्यातर्फे वर पक्षास देण्यात येणाऱ्या वस्तु वा रोख रक्कम
8) रात्रीच्या वेळी हवेच्या आर्द्रतेमुळे भूतलावर पडणारे थेंब
9) खाली उतरणे, ग्रंथातील उतारा
11) टेलिव्हीजनचे मराठीकरण
13) कबूल, अनुकूल, तयार
16) पृथ्वी, धरणी
18) माकड, बंदर
19) दुर्गती, वाईट स्थिती,, पचडा
20) मुलाची पत्नी
21) स्तुतीपत्रक, प्रशंसा करणारे पत्र
22) प्राणघातक विषारी द्रव्य
23) अंक, आंकडे
24) जादुगरी, हातचलाखी
26) मागच्या इतिहासाकडे सिंहासारखे अभिमानाने वळून पाहणे
28) विशेषतः थंडीच्या दिवसातील पहाटेची झोप
30) दुःख, चावी, किल्ली
32) दागिना, पर्वत
36) भावनादर्शक अभिनय
37) दृष्टी
38) श्रीकृष्णाने एका करंगळीवर उचललेला प्रसिद्ध पर्वत
39) उपासना, पूजा
40) एखाद्या गोष्टीची अतिशय आवड, छंद
43) चेहऱ्यावर वगैरे पडलेला पांढरा डाग
45) खोड, दुर्गुण
46) यज्ञाच्या शेवटी सर्व देवतांना दिलेली आहुती
48) अपक्क, लहान, कोमल
50) शरीराचे हावभाव, अभिनय
51) ललकारणे, युद्धास बोलावणे
53) चांगल्या कामाबद्दल पाठ थोपटणे
54) वडिलांचा भाऊ
59) लहान मुलांचा एक बैठा खेळ
60) हलका नसलेला, वजनदार
62) वजन, तोल
63) हिंस्त्र पशू, मांसभक्षक पशू
65) खेद, खिन्नता
66) कंटाळा, सुस्ती
67) तशा प्रकारे, त्यासारखा
69) लावालावी, भांडण
70) पुत्र, मुलगा

(उत्तर पुढील अंकी )

### भिजवलेल्या शेंगदाण्यांचे अनेक आरोग्यदायी फायदे

**पचनसंस्था सुधारते:** आरोग्य तज्ज्ञांच्या मते , भिजवलेले शेंगदाणे खाल्ल्याने पचनसंस्था सुधारते. त्यातील फायबर पोट स्वच्छ ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि गॅस सारख्या समस्यांपासून आराम मिळतो. **वजन कमी करण्यासाठी प्रभावी:** पचनसंस्था सुधारण्यासोबतच, भिजवलेले शेंगदाणे खाल्ल्याने वजन कमी होण्यासही मदत होते. प्रथिने आणि फायबर समृद्ध असल्याने, ते तुम्हाला बराच काळ पोट भरल्यासारखे वाटते, त्यामुळे वारंवार भूक लागणे टाळता येते.

# 'या' कॅप्सूल ठरतील तुमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय

**फिश ऑइलमध्ये कोणती पोषक तत्वे असतात?**

फिश ऑइल सप्लिमेंट्समध्ये ओमेगा-३ फॅटी सिडस्- मुख्यतः एझ- आणि उक्र--असतात, जे तुमच्या शरीराला अनेक मूलभूत कार्यांसाठी आवश्यक असतात. बहुतेक आधुनिक आहारात ओमेगा-३ पुरेशा प्रमाणात मिळत नसल्यामुळे, ही पोषक तत्वांची कमतरता भरून काढण्यासाठी अनेकदा सप्लिमेंट्सचा उपयोग होतो. **फायदे काय आहेत?**



हृदयाचे आरोग्य: फिश ऑइल रक्तातील ट्रायग्लिसराइडची पातळी १५-३०% पर्यंत कमी करू शकते. ट्रायग्लिसराइड्स हे रक्तप्रवाहात आढळणारे एक प्रकारचे फॅट आहे; ट्रायग्लिसराइडची वाढलेली पातळी अनेकदा हृदयरोगाचा धोका वाढवते.

**मेंदूचे आरोग्य:** फिश ऑइल सप्लिमेंट्स स्मरणशक्ती आणि एकाग्रता सुधारण्यास मदत करतात. ते ओमेगा-३ फॅटी सिडचा एक समृद्ध स्रोत आहेत, जे मेंदूच्या उत्तम आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक मानले जातात. **सांधेदुखीपासून आराम:** फिश ऑइलमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी सिड सांध्यांची सूज आणि ताठरपणा कमी करण्यास मदत करतात. हे ऱ्हुमॅटॉइड आर्थरायटिस आणि ऑस्टियोआर्थरायटिससारख्या आजारांशी संबंधित सकाळचा ताठरपणा आणि सांधेदुखी कमी करण्यास मदत करते. डोळ्यांच्या आरोग्यासाठी आधार: डोळ्यांच्या योग्य कार्यासाठी डीएचए देखील आवश्यक आहे. परिणामी, योग्य प्रमाणात फिश ऑइलचे सेवन केल्याने रेटिनाचे आरोग्य राखण्यास आणि स्पष्ट दृष्टीस मदत होते- विशेषतः जे लोक स्क्रीनकडे बघण्यात बराच वेळ घालवतात त्यांच्यासाठी. **त्वचेच्या आरोग्यात सुधारणा:** निरोगी चरबी त्वचा मऊ आणि कोमल ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. ओमेगा-३ त्वचेचा बाह्य थर मजबूत करतात, ज्यामुळे त्वचेतील ओलावा टिकून राहतो आणि कोरडेपणा टाळला जातो. **फिश ऑइल सप्लिमेंट्स कोणी घ्यावेत?** जे लोक खूप कमी प्रमाणात सी-फूड खातात, त्यांनी निश्चितपणे या सप्लिमेंटचा आपल्या आहारात समावेश करावा, कारण त्यांच्या आहारात ओमेगा-३ चे प्रमाण सामान्यतः कमी असते. जे कर्मचारी बराच वेळ बसून काम करतात, तसेच जे मानसिक तणावाने त्रस्त आहेत, त्यांनाही हे घेतल्याने फायदा होऊ शकतो.

# पशुपालकांना आर्थिक सशक्त करण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना प्रभावीपणे राबवा-ना.पंकजा मुंडे

पुणे (सरकार): 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारक्षम करुन त्यांना 'महाराष्ट्राचा आर्थिक कणा' करण्यावर भर आहे, ही योजना ग्रामीण पशुपालकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू सभागृहात 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सादरीकरण व अमंलबजावणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुदंडा, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड, बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, विभागाचे सहसचिव निवृत्तीनाथ मऱ्हाळे, पशुसंवर्धन विभागातील प्रादेशिक पशुसंवर्धन उपायुक्त तसेच



जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त उपस्थित होते.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना पशुपालनाकडे केवळ पारंपारिक व्यवसाय म्हणून न पाहता एक व्यावसायिक उद्योजकता म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनासाठी तांत्रिक व आर्थिक मदत देऊन ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पशुपालनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पशुजन्य उत्पादनांची उत्पादकता वाढवणे व स्थानिक स्तरावरच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगार विकासाच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या या पुढाकारामुळे राज्याच्या ग्रामीण विकास प्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे. त्यामुळे योजनेत पात्र लाभार्थ्यांची निवड करावी, योजनेत गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. ही योजना प्रभावीपणे राबवून यशस्वी करण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करावेत. योजनेचे जिल्हा, तालुकानिहाय शिबारांचे आयोजन करावे तसेच योजनांची अधिकाधिक जनजागृती करावी. कामाचा महिनानिहाय आढावा घेण्यात येईल. येत्या काळात लाभ वाटपाबाबत भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या. पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आदी व्यवसाय करुन शेतकऱ्यांमधून उद्योजक निर्माण होत आहेत. पशुसंर्वधनाला उद्योजकाचा दर्जा दिला पाहिजे. ग्रामीण युवकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. येत्या काळात वराहपालन व्यवसायावर भर द्यावा, अंड्याचा ब्रँड निर्माण करण्याकरिता सामूहिक दृष्टीकोन ठेवून प्रयत्न करावे. पशुसंवर्धन क्षेत्रात एक जिल्हा एक उत्पादन या तत्वावर काम करावे असे सांगून, परळी वैजनाथ येथे येथील महापशुसंर्वधन एक्स्पोचे यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल श्रीमती मुंडे यांनी विभागाचे अभिनंदन केले.



**ज्ञानसूर्य,युगपुरुष म. ज्योतिबा फुले यांची जयंती निवासी मतिमंद विद्यालय, वासनवाडीफाटा,पांगरी रोड,बीड येथे साजरी कारण्यात आली. याप्रसंगी उपस्थित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी.**

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या निर्देशानुसार परळीत मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासाठी १२ व १३ एप्रिलला विशेष कॅम्प

परळी वैजनाथ (सरकार) राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या निर्देशानुसार शहरात येत्या १२ व १३ एप्रिल रोजी मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. शहरातील भाजपचे सर्व बुथ प्रमुख प्रशासनाने नेमलेल्या बीएलओला यासाठी सहकार्य करणार असून प्रत्येक मतदारांनी स्वतःचे व कुटुंबातील सदस्यांचे नावाची तपासणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (ड्खठ) महाराष्ट्र राज्यात सुरुवात करण्याची घोषणा भारत निवडणूक आयोग करणार आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३०.१०.२०२४ रोजी अस्तित्त्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादीवरुन सन २००५ च्या मतदार यादीमधील मतदारांची मॅपींग करणे, अस्पष्ट फोटो (इडणठ झक्जढज), मतदारांचे नवीन रंगीत फोटो गोळा करणे अदयावत करणे तसेच मयत, दुबार, स्थलांतरीत व डीएससी च्या नोटीसची पडताळणी करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करणे आदी कामे विहित मुदतीत पार पाडण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

परळी विधानसभा मतदार संघाअंतर्गत परळी तालुक्यातील २५८ मतदान केंद्र प्रस्तावित असून सदर मतदान केंद्रासाठी केंद्रस्तरीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामकाज पूर्ण करण्यारीता दिनांक १२ व १३ रोजी विशेष मतदार मॅपींग कॅम्प चे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार सर्व मतदान केंद्रावर सकाळी १० ते सायं.५ या वेळेत सर्व बीएलओ मतदान केंद्रावर उपलब्ध असणार आहेत. तरी जास्तीत जास्त मतदारांनी मतदान केंद्रावर जावून आपापले मतदार मॅपींग, अस्पष्ट फोटो जमा करणे, व दुबार नावे, मयत व स्थलांतरीत नावे वगळणे इत्यादी कामे करून घ्यावीत. भाजपचे बुथ प्रमुख व पदाधिकारी प्रशासनाच्या मदत करणार असून मतदारांनी संबंधित बुथ प्रमुखांना अथवा भाजपच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क करावा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाने केले आहे.

## मातोश्री विद्यालयामध्ये क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची जयंती उत्साहात



बीड (सरकार) तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथील छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे सचिव मा. ॲड. सर्जेराव तात्या तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक नागरगोजे सर व प्रमुख पाहुणे भुतकर सर यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या महान कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. महात्मा फुले यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद व अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्यांनी स्त्रीशिक्षण शिक्षणासाठी मोठे कार्य केले. पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. तसेच समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

कार्यक्रमास नागरगोजे सर, भुतकर सर, जाधव सर, आंधळे सर, डोंगरे सर, गायकवाड सर, शेजुळ मॅडम, घरत सर, बेग सर, बिनवडे सर, हनुमंत दादा तांदळे, प्रदीप बाप्पू तांदळे, वाघमारे डी. डी., लक्ष्मण शेंडगे, श्रीमती घोडके तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तांदळे सर यांणी केले.

## लिंबागणेश येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन

बीड (सरकार): तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश येथे अखंड क्रांतीचे जनक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक व समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बाळासाहेब जाधव होते. यावेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश गायकवाड यांनी केले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, साहेबराव निर्मळ, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, रमेश गायकवाड, जीवन मुळे, सुरेश निर्मळ, मोहनराव कोटुळे, महादेव वाणी, ज्ञानेश्वर कुदळे, संजय पावले, खंडू वाणी, श्रीराम तागड, भीमराव बोराटे, सुभाष मुळे, मल्हारी आबदार, पोपट निर्मळ आदी उपस्थित होते.

## आ.क्षीरसागरांच्या प्रयत्नाने उर्दू घर होणार

### मुख्यमंत्री फडणवीसांची भेट घेऊन केली मागणी

बीड (सरकार) शहरातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध झाल्या नंतर आता आ. संदीप क्षीरसागर यांनी उर्द घरासाठी प्रयत्न सुरू केले आहे. या प्रकरणी त्यांनी शुक्रवारी (दि.१०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बीड येथे उर्दू घराला मंजुरी आणि निधी देण्याची मागणी केली. याबाबत मुख्यमंत्र्यांनी मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असल्याचे आ. क्षीरसागर यांनी सांगितले आहे. अल्पसंख्याक समाजाच्या अनेक दिवसांच्या मागण्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

शहरात आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याक समाज आहे. यामुळे बीड शहरात अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह आणि उर्दू घरची मागणी करण्यात येत आहे. यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा



सुरू आहे. याचे फलित म्हणून मार्च महिन्यात रमजान ईद च्या दिवशीच येथील किल्ला परिसरातील डाक बंगला म्हणून प्रसिद्ध असलेली जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी नगर विकास विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. यामुळे मुख्य जागेचा प्रश्न निकाली निघाल्याने आता याला मंजुरी मिळून हे वसतीगृहाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. यानंतर आता उर्दू घरासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांनी आज शुक्रवारी (दि.१०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. उर्दू घर संबंधी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यामध्ये आ. संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात उर्दू भाषेची वाङःमयीन प्रगती व्हावी तसेच मराठी व उर्दू भाषेमधील लेखक, कवी, विचारवंत इत्याधींमध्ये सर्जनशील विचारांची देवान - घेवाण होऊन उर्दू भाषेचा वाङःमयीन विकास व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र शासन उर्दू घर सारखा स्तुत्य उपक्रम राबवत आहे. ज्या ठिकाणी मुस्लिमबहुल वस्ती आहे, त्या ठिकाणी उर्दू घर उभारण्याचे शासनाचे धोरण आहे. माझ्या बीड विधानसभा मतदारसंघात शहरात मुस्लिम समाज मोठ्या संख्येने वास्तव्यास आहे. त्या अनुषंगाने उर्दू भाषेचा समृद्धीसाठी उर्दू घर उभारणे ही आवश्यक बाब आहे. त्यामुळे सर्व बाबींचा विचार करून बीड शहरात उर्दू घर उभारणीसाठी निधीसह मंजुरी द्यावी अशी मागणी केली. या मागणीसाठी मुख्यमंजुरी बाबत आश्वासन दिले आहे. अशी माहिती आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली आहे. तर याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. अल्पसंख्याक समाजाच्या दोन्ही मागण्यांसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत असून मुलींचे वसतिगृह आणि उर्दू घरासाठी पाठपुरावा सुरू केल्याने आ. संदीप क्षीरसागर यांचे मुस्लिम समाजाकडून आभार मानले जात आहेत.

## मंगळवार पासुन दहीफळ येथील वडमाऊली देवीच्या यात्रेचे आयोजन

केज (सरकार) केज तालुक्यातील दहीफळ वडमाऊली येथे ब दर्जा प्राप्तचे तिर्थक्षेत्र असलेल्या वडजुआई (वडमाऊली) देवीचा यात्रा महोत्सव दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मंगळवार दि.१४ एप्रिल ते १८ एप्रिल शनिवार या दरम्यान होत असलेल्या या यात्रे निमित्त ग्रामीण भागातील रशिक बांधवांच्या मनोरंजानासाठी आराधी गिते व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.भावीक भक्तानी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे,बन्सी ठोंबरे रामहारी ठोंबरे व इतर सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.

केज तालुक्यातील दहीफळ वडमाऊली येथे ब दर्जा असलेले तिर्थक्षेत्र वडजुआई (वडमाऊली) देवीचे मंदीर आहे.दरवर्षी चैत्र महीन्यातील अष्टमी पासुन या यात्रेला सुरुवात होते. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि.१४ एप्रिल मंगळवारी सकाळी देवीची पालखी



दहीफळ येथून बँड लेझीम पथक व आराधी मंडळी देवीची गाणे गाऊन पालखी महोत्सवात सहभागी होतात.या वडजुआई (वडमाऊली)देवीला महीला पुरणपोळीचा नैवद दाखवुन सुवासीनी जेवणाचा कार्यक्रम करतात. यात्रेनिमित्तदहीफळ वडमाऊली येथील माजी पंचायत समीती सदस्य दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे,वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार),सदस्य हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे, बन्सी ठोंबरे,रामहारी ठोंबरे सह सर्व सदस्यांनी व गावक-यांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील जनतेच्या मनोरंजनासाठी १४ एप्रिल मंगळ-वारी संध्याकाळी आठ वाजता सांस्कृतीक कार्यक्रम व देवीमंदीर परिसरात आराधी गितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.बुधवारी व गुरुवारी संध्याकाळी आराधी गीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे.दि.१७ एप्रिल शक्रवारी संध्याकाळी वडमाऊली देवी मंदीर परीसरात देवीचा (छबीना) पालखीमिरवणूक होईल तर.दि.१८ एप्रिल शनिवारी संध्याकाळी दहिफळ गावात देवीचा (छबिना) पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता होणार आहे.या आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात यात्रेकरु भावीक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडू (नाना) ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे, सदस्य गंगाधर गदळे, रामहारी ठोंबरे,बन्सी ठोंबरे सह इतर सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.

## भारताचा पाया माझा भीमराया

### प्रा.जगदिश ओहोळ यांचे प्रतिपादन

बीड (सरकार) ज्या वस्तीत कधी दिवा लागत नव्हता, सावलीचाही विटाळ मानला जात होता, जिथे माणूस असूनही माणसाला माणसासारखे जगू दिले जात नव्हतेह्नअशा अंधकारमय परिस्थितीत प्रज्ञासूर्याचा जन्म झाला. त्या महान व्यक्तिमत्त्वाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची बीजे रोवून समाजाला नवा प्रकाश दिला. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचा भक्कम पाया आहेत, असे प्रभावी प्रतिपादन 'जग बदलणारा बाप माणूस' या पुस्तकाचे लेखक प्रा. जगदिश ओहोळ यांनी केले.

बीड शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. ९) आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. त्यांच्या ओजस्वी आणि विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थितांमध्ये सामाजिक जाणीव आणि प्रेरणेची नवी चेतना निर्माण झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे उपयुक्त उमेश सोनवणे




होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक संचालक दत्तात्रय क्षीरसागर, उपयुक्त (कौशल्य विभाग) समाधान किरवले, गोविंद कदम, अंकुश निर्मळ, अमरसिंह ढाका यांची उपस्थिती लाभली.

आपल्या भाषणात प्रा. ओहोळ यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा जागतिक प्रभाव अधोरेखित करताना सांगितले की, जगाच्या ज्ञानवेशीवर मानल्या जाणाऱ्या कोलंबिया विद्यापीठात त्यांचा पुतळा उभारलेला आहे, ही त्यांच्या विचारांची जागतिक दखल असल्याची साक्ष आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक महादेव इनकर, प्रा.संजय सावते यांनी केले. तर आभार प्रणित सरवदे यांनी मानले. ही व्याख्यानमाला केवळ कार्यक्रम न राहता, सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारा विचारांचा जागर ठरला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांनी मोलाचे योगदान दिले.

## मराठवाड्याच्या लेखणीतच धार

### मराठवाडा साहित्य संमेलनातील परिसंवादाचा सूर

बीड (सरकार) शांतीवन आर्वी येथील ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनात 'मराठवाड्यातील आजचे लेखन किती दखलपात्र?' या विषयावर नामांकित कवी आणि लेखकांचा परिसंवाद झाला. या परिसंवादात मराठवाड्यातील लेखकांच्या लेखणीत धार आहे. सामाजिक प्रश्नावर प्रहार करताना मराठवाड्यातील लेखक मागेपुढे पाहत नाहीत. सामाजिक भान जपत रोखठोक आणि सडेतोड भाष्य ही मराठवाड्याची दखलपात्र लेखणी आहे असे विचार परिसंवादातील लेखक- कवींनी व्यक्त केले.

मराठवाडा साहित्य परिषद व भवानी विध्यार्थी कल्याण प्रतिष्ठान, शांतीवन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठवाडा साहित्य संमेलनात मराठवाड्यातील आजचे लेखन किती दखलपात्र?' या विषयावर कवी विठ्ठल बिडकर विसपीठावर परिसंवाद झाला. या परिसंवादात मराठवाड्यातील लेखकांच्या विविध लेखन प्रकारावर मान्यवर कवी व लेखकांनी आपले विचार व्यक्त केले. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कैलास अंबुरे होते. यावेळी शशिकांत पाटील यांनी चरित्र व आत्मचरित्र, ज्ञानदेव राऊत, यांनी कादंबरी व कथा, गणेश शिंदे नाटक, धनंजय गुडसुरकर यांनी बालसाहित्य तर योगिनी सातारकर यांनी कविता लेखनावर उपस्थित मान्यवरांशी परिसंवाद साधला. धनंजय गुडसुरकर यांनी मराठवाड्यातील बालसाहित्यावर विशेष लेखन करणारे रा. रं. बोराडे, भारत सासणे, सुरेश सावंत, दासू वैद्य, गणेश घुडे, मंजिरी देशपांडे,उद्धव दहिवाल, उर्मिला चाकूरकर, विठ्ठल जाधव, तसेच कवितेच्या माध्यमातून फ.मु.शिंदे, इंद्रजीत भालेराव, दासू वैद्य, नाट्य लेखनात डॉक्टर सतीश साळुंखे तसेच कथा आणि कादंबरी लेखनातील मराठवाड्यातील लेखकांनी ग्रामीण भागाचे चित्रन प्रभावीपणे मांडले आहे. दीपक काका नागरगोजे यांनी हिरवं सपान, गुलामीतलं जीन या पुस्तकातून शेतकरी आत्महत्या, ऊसतोड मजुरांची मुले यांचे प्रश्न मांडले आहेत. ग्रामीण भागाचे आणि इथल्या प्रश्नांचे वास्तव चित्र त्यांनी आपल्या लेखणीतून केले आहे. अलीकडच्या काळात मराठवाड्यातील लेखक सामाजिक प्रश्नावर कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र अशा साहित्य प्रकारातून प्रभावीपणे लेखन करत असल्याचे परिसंवादातील सर्वच मान्यवरांनी सांगितले. यामुळे आज घडीला मराठवाड्यातील लेखकांची लेखणी दखल पात्र आहे, असा एकंदरीत सूर या परिसंवादातून उमटला.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)